जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 MAR 2023 लोकमत



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटीक मैदानात शनिवारपासून दोन दिवसीय राज्य सबज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले.

# रणवीर, राजेश्वरी, जीविकाची बाजी

## राज्य सबज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेस शानदार सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महाराष्ट्र राज्य सबज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेच्या पहिल्या दिवशी रणवीर शेंडे (नागपूर), राजेश्वरी पाटील (सांगली), जीविका सोनाग्रे (मुंबई), राईसा सावंत (मुंबई) यांनी अनुक्रमे गोळाफेक, उंचउडी, लांबउडीत प्रथम क्रमांक पटकाविला.

शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटीक ट्रॅकवर शनिवारपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत ८, १० आणि १२ वर्षांखालील ३१ जिल्ह्यातील १२०० खेळाडूंनी सहभागी झाले आहेत. सकाळच्या सत्रात झालेल्या स्पर्धेचा निकाल असा, दहा वर्षांखालील मुले (गोळाफेक)- रणवीर शेंडे, प्रथम (नागपूर), शिवेन खाडे, द्वितीय (पुणे), पार्थ सपटे (धाराशिव), तृतीय, मुलींमध्ये राजेश्वरी पाटील (सांगली), तनिशा जदयाल (रत्नागिरी), दुर्विशा देवलेकर (मुंबई). बारा वर्षांखालील मुली (उंचउडी) जीविका सोनाग्रे (मुंबई), रावी रोकडे (पुणे), जोशिका राणी (मुंबई). आठ वर्षांखालील मुली लांबउडी- राईसा सावंत (मुंबई), आरोही डोंगरे (लातूर), स्पृहा कसबे (मुंबई) यांचा समावेश आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष डॉ. व्ही. एन. मगदूम, एनसीसी ग्रुप मुख्यालयाचे ट्रेनिंग ऑफिसर कर्नल समीर मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

प्रास्ताविक असोसिएशनचे सचिव डॉ. सुरेश फराकटे, तर अध्यक्ष आर. बी. पाटील यांनी स्वागत केले.

यावेळी राज्य असोसिएशनचे सचिव सतीश उच्चील, उपाध्यक्ष संजय पाटील, राजू पॅटी, सचिव राजगुरू, राजगुरू खोचरे, शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाचे डॉ. शरद बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकमत

# छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय नेतृत्व

मुलाखत

थोर इतिहासकार डॉ. बाळ कृष्ण यांच्या 'शिवाजी द ग्रेट' या शिवचरित्राच्या मराठी अनुवादित ग्रंथाचे उद्या सोमवारी प्रकाशन होत आहे. यानिमित्त या ग्रंथाचे संपादक, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांची ही मुलाखत.

**प्रश्न :** डॉ. बाळ कृष्ण यांच्या शिवचरित्राचा अनुवाद करावासा का वाटला?


**उत्तर :** पंजाबमध्ये जन्मलेले; परंतु कोल्हापूर, महाराष्ट्र आणि शिवरायांशी एकरूप झालेले, शाहू महाराजांनी राजाराम कॉलेजचे प्राचार्य म्हणून निवडलेले असे हे डॉ. बाळ कृष्ण. त्यांनी १९३० ते १९४० ही दहा वर्षे परिश्रम घेऊन इंग्रजीमध्ये शिवचरित्र लिहिले होते. परंतु, मराठी वाचक या इंग्रजीतील चरित्राकडे वळला नाही. त्यामुळे ते उपेक्षित राहिले. त्याचा लाभ या मराठी वाचकांना व्हावा, शिवरायांचे व्यापक राजकारण समजावे यासाठी माझ्या संपादकत्वाखाली सांगली येथील पत्रकार वसंत आपटे यांनी या शिवचरित्राचा अनुवाद केला आहे.

**प्रश्न :** डॉ. बाळकृष्ण यांच्या या शिवचरित्राची वैशिष्ट्ये काय आहेत?

**उत्तर :** या शिवचरित्राच्या आधी जी चरित्रे लिहिली गेली ती प्रामुख्याने बखर, मराठी आणि थोडी इंग्रजी साधनांच्या आधारावर लिहिली गेली. डॉ. बाळ कृष्ण यांचे हे चरित्र इंग्लिश, फ्रेंच, पोर्तुगीज आणि डच साधनांवर आधारित असे आहे. डच साधने तर पहिल्यांदा केवळ डॉ. बाळ कृष्ण यांनीच वापरली. हे या चरित्राचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**प्रश्न :** या चरित्रामध्ये आणखी वेगळी मांडणी काय आहे?

**उत्तर :** या चरित्राच्या अनुवादित पहिल्या खंडामध्ये डॉ. बाळ कृष्ण यांनी शहाजी महाराजांच्या भूमिकेविषयी जे सविस्तर लेखन केले आहे त्याचा समावेश केला आहे. शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यनिर्मितीसाठीची आवश्यक अशी पार्श्वभूमी शहाजी महाराजांनी निर्माण केली होती. एका अर्थाने शहाजी महाराज हेच स्वराज्याचे संकल्पक होते, अशी मांडणी डॉ. बाळ कृष्ण यांनी केली आहे.



जयसिंगराव पवार

**प्रश्न :** डच भाषेत शिवछत्रपतींबद्दल काही वेगळ्या नोंदी आहेत का?

**उत्तर :** शिवाजी महाराजांनी जो दक्षिण दिग्विजय मिळवला त्यांच्या सविस्तर नोंदी डच भाषेमध्ये उपलब्ध आहेत. या नोंदीमुळे शिवाजी महाराजांचा प्रभाव मराठी मुलुखाबाहेरही कसा होता याचे चित्रण आढळून येते.



**प्रश्न :** एकूणच डॉ. बाळ कृष्ण यांचे हे चरित्र काय संदेश देते?

**उत्तर :** विदेशी साधनांच्या आधारे डॉ. बाळ कृष्ण यांनी शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हेत तर राष्ट्रीय नेतृत्व होते अशी या शिवचरित्रातील केलेली मांडणी महत्त्वपूर्ण ठरते. हिंदुस्थानावर असलेल्या तत्कालीन मुस्लीम राजवटींच्या विरोधात ठामपणे उभे राहण्यासाठीची खंबीर भूमिका शिवाजी महाराजांनी घेतली, त्यासाठी जे जे काही करावे लागत होते ते ते त्यांनी केले.

**- समीर देशपांडे**

(लेखक हे 'लोकमत'चे वरिष्ठ बातमीदार आहेत.)

05 MAR 20..

पुढारी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘शिवाजी द ग्रेट’च्या परदेशी संदर्भ साधनांवर आधारित शिवचरित्राची मराठीत निर्मिती

## डॉ. बाळ कृष्ण यांचे संशोधन कार्य : शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवानिमित्त शाहू संशोधन केंद्राचा उपक्रम


**कोल्हापूर : सागर यादव**

शिवरायांचा इतिहास जुलमी अफजलखानाचे पोट फाडण्यापुरता आणि शाहिस्तेखानाची बोटं तोडण्यापुरता मर्यादित स्वरूपात दाखविण्यात आला आहे. याला बगल देत, शिवछत्रपती भारतीय स्वातंत्र्याचा ध्रुवतारा होते. महान देशभक्त आणि मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरिता लढणारे अमर अवतारी पुरुष ठरले. इतकेच नाही तर त्यांनी जगज्जेत्यांच्या नभोमंडलात उच्च स्थान पटकावले आहे, अशा शब्दांत थोर इतिहास संशोधक डॉ. बाळ कृष्ण यांनी शिवछत्रपतींची महती सांगितली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून तीन वर्षांच्या अथक प्रयत्नांतून डॉ. बाळ कृष्ण यांच्या संशोधनावर आधारित ‘शिवाजी द ग्रेट’ या इंग्रजी शिवचरित्रावर आधारित ‘महान शिवाजी’ खंड १-२ आणि खंड ३-४ या दोन ग्रंथांची निर्मिती करण्यात आली आहे. या शिवचरित्राचे संपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले आहे. तब्बल ५० हून अधिक पानांची प्रदीर्घ व विवेचक प्रस्तावना डॉ. पवार यांनी या शिवचरित्रासाठी लिहिली आहे. अनुवाद वसंत आपटे यांनी केला आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १४०० पानांच्या दोन खंडांच्या शिवचरित्राची निर्मिती करण्यात आली आहे. सोमवार, दि. ६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता, पद्मश्री खा. कुमार केतकर यांच्या हस्ते आणि शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली या शिवचरित्राचा प्रकाशन सोहळा होणार आहे.

### शिवाजी विद्यापीठाचे आद्य संकल्पक

डॉ. बाळ कृष्ण यांचा जन्म २२ जुलै १८८२ रोजी पंजाबमधील मुलतान येथे झाला. १९१८ साली ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. इतिहास विषयात लंडन विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळवली. भारतात परतल्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या आग्रहामुळे ते कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. पुढील १८ वर्षे ते कोल्हापुरात होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने कोल्हापूरला विद्यापीठ उभारण्याची संकल्पना त्यांनी मांडली असल्याने शिवाजी विद्यापीठाचे ते आद्य संकल्पक ठरले. २१ ऑक्टोबर १९४० रोजी त्यांचे निधन झाले.







### हे संशोधन नव्या अभ्यासकांसाठी प्रेरक

आपल्या प्रकृतीचा विचार न करता अथक परिश्रम आणि हजारो रुपये खर्चून डॉ. बाळ कृष्ण यांनी शिवचरित्राची निर्मिती केली होती. पारंपरिक मराठी, मोडीतील बखरींबरोबरच प्रथमच इंग्लिश, डच, पोर्तुगीज आणि फ्रेंच रेकॉर्डस्‌चा वापर त्यांनी आपल्या संशोधनासाठी केला. त्यांच्या या संशोधनाचा उपयोग शिवचरित्र लिहू पाहणाऱ्या नव्या संशोधक-अभ्यासकांना एक दिशा देणारा ठरणार आहे.

- डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ इतिहास संशोधक,
महान शिवाजी ग्रंथाचे संपादक

### तब्बल १० वर्षे इतिहास संशोधन

कोल्हापुरातील राजाराम महाविद्यालयात प्राचार्य म्हणून नियुक्त झाल्यानंतर त्यांनी शिवछत्रपतींच्या जीवनकार्याचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम मराठी भाषा शिकली. मराठीतील मूळ ऐतिहासिक कागदपत्रांचे त्यांनी वाचन केले. शिवचरित्रासाठी माहिती संकलनासाठी त्यांनी लंडन, बटाविया, हेग, गोवा, पाँडिचेरी, चेन्नई, तंजावर, सातारा, पुणे येथील पुराभिलेखागारांना भेटी दिल्या. असंख्य कागदपत्रांतून संदर्भ घेतले. संशोधनासाठी तौलनिक भूमिका स्वीकारून शिवचरित्रातील चुका टाळण्यासाठी मराठी कागदपत्रांमधून मिळणाऱ्या माहितीची परदेशी कागदपत्रांतील माहितीशी तुलना करूनच ती वापरली. शिवचरित्र इंग्रजी भाषेतून असल्यामुळे मराठी, डच आणि पोर्तुगीज भाषांतील मूळ कागदपत्रांतील मजकूर डॉ. बाळ कृष्ण यांनी तज्ज्ञांकडून इंग्रजीमध्ये भाषांतरित करून घेतला. अशा या संशोधनातून १७०० पानांचे आणि ४ खंडाचे शिवाजी द ग्रेट हे इंग्रजी भाषेतील शिवचरित्र डॉ. बाळ कृष्ण यांनी निर्माण केले.

### स्वराज्य ...ल्पक शहाजीरा... जिजाऊ

स्वराज्य...ल्पक शहाजीराजे व राजमाता जिजाऊ यांचे ...र्शन, पाठबळ आणि त्यांनी निर्माण केले... भक्कम पायावरच शिवछत्रपतींनी रयतेचे स्वतं... सार्वभौम स्वराज्य निर्माण केल्याची मा... सर्वप्रथम डॉ. बाळ कृष्ण यांनी आपल्या शि...त्रात मांडली. स्वराज्य स्थापन करण्याची प्र...रणा आणि भव्य उत्कट असा वारसा शिव...ना शहाजीराजांकडून मिळाला. तर त्याग, स..., कर्तव्यकठोरता, आदर आणि सन्मान अशी...तम मूल्ये जिजाऊंमुळेच शिवबांच्या म... खोलवर रुजली होती. यामुळेच पुढ...काळात मोहाच्या कित्येक प्रसंगांतही शि...राजांचे चित्त किंचितमात्र विचलित झा...ही, अशा शब्दांत डॉ. बाळ कृष्ण यांनी ...राजे व जिजाऊ यांच्या कार्यावर प्रकाशझोत ...ला आहे.

पुढारी

# जपानी संस्कृतीने विद्यापीठातील विद्यार्थी भारावले...

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जपानी ओरिगामी कला, पारंपरिक खेळ, वस्त्रपरंपरा, चित्रकला, संगीत संस्कृतीने शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी भारावून गेले.

जपानच्या क्योतो सेइका विद्यापीठातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठास भेट दिली. विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या वतीने या विद्यार्थ्यांच्या साथीने विशेष कला-सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनीही आपल्या जपानी व रशियन भाषाकौशल्यासह त्या भाषांतील गीत-संगीताच्या ज्ञानाचेही सादरीकरण केले. या विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार प्रदर्शित केले. यात चित्रे, संगीत, शिल्पकला, व्हिडीओ, जपानी पारंपरिक वस्त्र डिझाईन, मांगा कॉमिक्स, ओरिगामी, जपानी पारंपरिक खेळ केन्दामा यांची प्रात्यक्षिके दाखविली.

समन्वयक श्रीमती सायुरी मात्सुनो आणि क्योतो सेइका विद्यापीठातील प्रा. शिन मात्सुमुरा, कोता तोदा, युको यासुइ, तसेच विविध विद्याशाखांचे विद्यार्थी रिन्तारो फुजिता, तेम्मा मियोशी, कोता योशिओका, रियोता सकामोतो, केन योशिकावा, त्सुमुगी निशिमुरा, मोएको नाइतो, युकिका नारादाते, कुणाल मात्सुनो यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश होता.

समन्वयक मात्सुनो, प्रा. मात्सुमुरा यांनी, डॉ. मेघा पानसरे व इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. एस. बी. सादळे यांच्यासह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची भेट घेतली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता प्रा. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. प्रा. एस. बी. सादळे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठाकडून मिळणार स्टार्टअप्सना प्रोत्साहन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन हे इन्क्युबेशन सेंटर सुरू झाले आहे. सध्या येथे शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, अन्न क्षेत्रांतील २३ स्टार्टअप उद्योगांना बळ देण्याचे सुरू झाले आहे. यंदाचे वर्ष हे जागतिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे होत आहे. त्याच्या माध्यमातून विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरमध्ये विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना तृणधान्य पेरणी, मशागत, उत्पादन, साठवण तसेच मार्केटिंग यामध्ये उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर उपाय व समाधान सुचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमातून देण्यात आली आहे. विद्यार्थी, शिक्षक व नागरिक यांनी संकल्पना १५ मार्चपर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर जाऊन गुगल फॉर्ममध्ये भराव्यात व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

सकाळ

अवतीभवती

# शिवाजी विद्यापीठातर्फे 'स्टार्ट अप्स'साठी आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन हे इनक्युबेशन सेंटर विद्यापीठात सुरू झाले आहे. सध्या येथे शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, अन्न इत्यादी क्षेत्रांतील २३ स्टार्टअप उद्योगांना बळ दिले जाते. या सेंटरमधील योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

या सेंटरमध्ये विद्यार्थी, संशोधक, नागरिकांना तृणधान्य पेरणी, मशागत, उत्पादन, साठवण तसेच मार्केटिंग यामध्ये उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उपाय, समाधान सुचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमातून दिली आहे. इतर विषयांवरीलही नावीन्यपूर्ण संकल्पना व त्यावरील उद्योग याबाबत केंद्रातून नवयुवकांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निवड झालेल्या स्टार्टअप्सना महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य, स्टार्टअप इंडिया, केंद्र सरकार, एम.एस.एम.ई. व इतर शासकीय व खासगी संस्थांकडून सीड-मनी मिळण्याची संधी आहे. त्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, नागरिकांनी त्यांच्या संकल्पना १५ मार्चपर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर जाऊन गुगल फॉर्ममध्ये भराव्यात. योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन या सेंटरचे संचालक प्रा. एम. एस. देशमुख यांनी केले.